श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट, कराडचे

## विठामाता विद्यालय कराड

बुधवार पेठ, कराड
तालुका- कराड, जिल्हा- सातारा
पिन कोड 415110

नवोपक्रम

# "मदत तंत्रज्ञानाची, गाथा स्वातंत्र्यवीरांची"

इयत्ता - नववी

**स्पर्धा गट क्रमांक 3**

**माध्यमिक स्तर इ. 9 ते 12 वी**

शिक्षकांचे नाव- सौ. उज्वला जनार्दन मोरे, कराड

# अनुक्रमणिका


| अ.नं | नवोपक्रम लेखन मुद्दे |
|---|---|
| 1 | नवोपक्रमाचे शीर्षक |
| 2 | शिक्षक माहिती |
| 3 | नवोपक्रमाची गरज व महत्व |
| 4 | नवोपक्रमाची उद्दिष्टे |
| 5 | नवोपक्रमाची नियोजन |
| 6 | नवोपक्रमाचे फोटो |
| 7 | नवोपक्रमाची कार्यपध्दती |
| 8 | नवोपक्रमाची यशस्विता व फलनिष्पत्ती |
| 9 | समारोप |
| 10 | संदर्भसूची व परिशिष्टे |

# शिक्षक माहिती

| | |
|---|---|
| नवोपक्रमाचे नाव- | "मदत **तंत्रज्ञानाची, गाथा स्वातंत्र्यवीरांची"** |
| नवोपक्रमाचा राबविलेला स्तर- | माध्यमिक स्तर (9 वी ते 12 वी) |
| नवोपक्रमाचे क्षेत्र- | सामाजिक, ऐतिहासिक |
| स्पर्धकाचे नाव - | **सौ. उज्वला जनार्दन मोरे** |
| पत्ता- | अष्टविनायक कॉलनी, विद्‍यानगर<br>सैदापूर, ता- कराड, जिल्हा- सातारा |
| भ्रमणध्वनी- | 8208062675 |
| ई मेल- | ujwalamore0610@gmail.com |
| जन्मतारीख- | 19 मार्च 1973 |
| शैक्षणिक अर्हता- | B.A. M.A |
| व्यावसायिक अर्हता- | D.Ed, B. Ed |
| नवोपक्रमाचा कालावधी - | 15 जून ते नोव्हेंबर |
| शाळेचे नाव- | विठामाता विद्‍यालय, कराड |
| शाळेचा पत्ता- | शिवाजी हौसिंग सोसायटी<br>बुधवार पेठ, कराड<br>ता- कराड, जि. सातारा<br>पिन कोड- 415110 |

# नवोपक्रमाची गरज व महत्व

## 1. उपक्रम निवडण्याचे कारण-

मी एकदा ऑफ तासाला 9 वी च्या वर्गावर गेले असता मुलींना सहज विचारले स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव म्हणजे काय?  काही मुलींनी छान उत्तरे दिली काही शांत राहिल्या आपल्या देशाला स्वातंत्र्य कसे मिळाले? तुम्हाला कोणकोणते क्रांतिकारक माहित आहेत? हा प्रश्ना विचारल्यावर काही मोजकीच नावे मुलीनी सांगितली, ज्याचा पाठयपुस्तकाशी संबंध होता. त्यातही नेते, समाजसुधारक यांचीही नावे क्रांतीकारक म्हणून सांगितली. मी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याविषयी विचारले असता खूपच त्रोटक माहिती मुलींनी सांगितली काही ठराविक नावे म्हणजे सर्व क्रांतिकारक मनात घोळणारा हा प्रश्न मी स्टाफरुमध्ये ही विचारला तेव्हा काही मोजकीच नावे समोर आली. ज्यांचा संबंध पाठ्य पुस्तकांशी होता.

या देशाच्या स्वातंत्र्यलढयात हजारो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी आपल्या सर्वस्वाचा त्याग केला. प्राणांची आहुती दिली. फासावर लटकले. इंग्रजानी त्यांच्या घरादारावर नांगर फिरवले सातारा जिल्हयात प्रतिसरकार स्थापन करणारे नाना पाटील यांचे गाव कोणते? त्यांचे कार्य काय? याबद्दल मुलींना सांगता आले नाही. क्रांतीकारक असीम त्याग, प्रखर देशभक्ती, साहस, धैर्य, स्वाभिमान यांची साक्षात उदाहरणे आहेत. 14-15 वर्षाच्या सुनिता चौधरी, शांती घोष पासून लोकमान्य टिळकांच्यापर्यंत लाखोंच्या संख्येने हे वीर आहेत. त्यांच्या उज्ज्वल चारित्र्याची ओळख मुलींना झालीच पाहिजे त्यांच्या चरित्रातून शाश्वत जीवनमूल्ये या पिढीपर्यंत पोहचलीच पाहिजेत. इतिहास म्हणजे फक्त भूतकाळ नव्हे. तर तो मानवाला सजग व कार्यक्षम बनवतो. या हेतूने मी क्रांतीकारकांच्या विषयी Video तयार करत होते.

मुली इतर माहिती ऐकतात व काही काळानंतर विसरुन जातात, असे होत आहे का? मी Video तयार करताना एकत्र केलेली माहिती पुस्तके, संदर्भग्रंथ, इंटरनेट अशा विविध माध्यमातून गोळा करुन त्याचे ऑडिओ Video करुन विद्यार्थ्यापर्यंत पोचवत होते. मेहनत घेत होते. त्याची फलश्रुती काय? विद्यार्थीनीनी ती माहिती आत्मीयतेने ऐकावी संग्रही ठेवावी त्यातून या वीरांची चरित्रे जाणून घेऊन स्वत:मध्ये बदल घडवून आणावा हेतू साध्य होतोय का?

या अस्वस्थेतेतूनच या उपक्रमाची निर्मिती झाली मी घेत असलेली मेहनत मुलींनी घेतली तर? मुलींनी Video तयार केले तर भावनिक दृष्टया त्या त्याच्याशी जोडल्या जातील अवांतर वाचन करतील तंत्रस्नेही बनतील व सर्वात महत्वाचे त्यांनी संकलित केलेली माहिती त्या कधीच विसरणार नाहित. स्वयअध्ययनातून कृतीयुक्त शिक्षणाचा आनंद मिळेल व मला अभिप्रेत हेतू ही साध्य होईल.

मुलींना ही कल्पना सांगताच, त्या खूप आनंदी झाल्या त्याचे कुतुहल जागे झाले. त्यांनी पुस्तके, शिक्षक, पालक, मित्र-मैत्रिणी, इंटरनेट यांची मदत घेतली व स्वतः:च्या आवाजात रेकॉडिंग करुन Video तयार केले. त्यातून ज्ञानाचे दृढीकरण तर झालेच पण मुली या महान व्यंक्तिमत्वाच्या चरित्राशी भावनिकदृष्टया जोडल्या गेल्या. त्यांच्या बद्दलची कृतज्ञतेची आदराची भावना निर्माण झाली. त्यांच्यासाठी जीवनातील ही आदर्श व्यक्तिमत्वे झाली.

माझा हा उपक्रम कृतीयुक्त सहभागातून साध्य झालाच महत्वाचे म्हणजे जीवनमुल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी खूप महत्वाचा ठरला. मुली तंत्रस्नेही झाल्या इतिहास व तंत्रज्ञान याची उत्तम सांगड विद्यार्थीनीनी घातली.

## नवोपक्रमाचे वेगळेपण

⁎ या उपक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थीनीनी 40 क्रांतीकारकांच्या चरित्राचा अभ्यास केला.

⁎ अवांतर वाचनातून या वीरांची माहिती स्वत:च्या शब्दात संकलित केली

⁎ स्वत:च्या आवाजात माहिती रेकॉडिंग केली.

⁎ "आधी केले, नंतर सांगितले." या उक्तीप्रमाणे मी स्वत: 80 Video तयार केले व नंतर मुलींच्याकडून 40 Video करुन घेतले

⁎ मी राष्ट्रभाषा हिंदी मध्ये Video तयार केले, मुलींनी मातृभाषा मराठीमध्ये Video तयार केले.

⁎ मुलींनी स्वयअध्ययनातून Video निर्मितीचे तंत्रज्ञान शिकून घेतले व त्याचा वापर केला.

⁎ मुलींच्या सर्जनशीलतेनुसार प्रत्येक Video इतरांच्या पेक्षा वेगळा आहे.

⁎ शाळेत यानिमित्ताने देशभक्तीचे वातावरण तयार झाले इतिहास म्हणजे भूतकाळ नव्हे तर आमचा स्वाभिमान आहे. ही भावना वाढीस लागली.

⁎ इतिहासाची आवड निर्माण झाली कुतूहल जागे झाले. यानिमित्ताने सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिकांची ही माहिती मुलींना झाली.

⁎ या महान व्यक्ती कशा घडल्या याबाबत मुली आपआपसात चर्चा करु लागल्या माहितीची देवाणघेवाण झाली.

⁎ मुलींनी ही माहिती आपले कुंटुब मित्रमैत्रिणी, नातेवाईक यांच्यापर्यंत पोचवली.

⁎ उपक्रम 40 मुलीच्यावर राबवला असला तरी संपूर्ण शाळेमध्ये त्याची चर्चा झाली इतर मुलींना तो जाणून घ्यायची त्यात भाग घ्यायची इच्छा झाली.

⁎ ऐतिहासिक स्थळे, राष्ट्रीय प्रतिके याकडे पहाण्याचा मुलींचा दृष्टीकोन बदलला.

⁎ 9 ऑगस्ट क्रांतिदिन, 15 ऑगस्ट स्वातंत्र्यदिन साजरा करताना मुलींचा उत्साह देशाभिमान प्रत्येक कृतीतून व्यक्त होत होता.

* विद्यार्थीनी तंत्रस्नेही झाल्या.

* मुलींच्यात आत्मविश्वास वाढला.

* निबंध व वक्तृत्व स्पर्धातील यशातून मुलींमध्ये बदल जाणवू लागले.

* माझा Video चांगला व्हावा या हेतूने सुप्त स्पर्धा निर्माण झाली

* प्रतिसादाचे प्रमाण वाढले 90% झाले.

* अवांतर वाचन वाढले

* माहितीचे स्त्रोत शोधू लागल्या

* स्वयंअध्ययन कौशल्य विकसित झाले.

* माझे 80 Video व मुलींचे 40 Video हे एक उत्तम शैक्षणिक साधन तयार झाले.

* ऐतिहासिक पुरावे तपासले जावू लागले.

* सहअध्याची शिक्षण वाढले, सहकार्यांची भावना वृध्दिंगत झाली.

* देशाच्या या वीरांची चरित्रे थोडक्यात Video रुपाने Youtube वर अपलोड केल्याने ती सर्वांना पहाता येतील.

* या माहितीचा उपयोग इतर शिक्षक विद्यार्थी करु शकतात.

* समाजासाठी याचा नक्कीच फायदा होईल.

## नवोपक्रमाची उपयुक्तता

⁎ 40 विद्यार्थीनी तंत्रस्नेही झाल्या.

⁎ या अभ्यासाने जीवनमूल्ये रुजली.

⁎ राष्ट्रीय प्रतिके याबद्दल आदर व सार्थ अभिमान निर्माण झाला

⁎ इतिहासाविषयी चर्चा करु लागल्या

⁎ झालेल्या चुका शोधून मुली स्वत:च शिकू लागल्या, आणि इतरांना हि सांगू लागल्या.

⁎ एकमेकिंना मदत करण्याची प्रवृत्ती वाढली

⁎ लेखन सुधारले, मुद्देसुद मांडणी करु लागल्या

⁎ अध्यापन, अध्ययनयात रस आवड निर्माण झाली

⁎ मुलींनी स्वत: इतरांची मदत घेऊन तंत्रज्ञान शिकून घेतले

⁎Video बनवताना सर्व कृती स्वत: केल्या त्यांच्यातील चुका समजून घेऊन दुरुस्ती केली.

⁎ आत्मविश्वास वाढला.

⁎ लेखन कौशल्य सुधारले.

⁎ वक्तृत्व सुधारले उच्चारण, आरोह- अवरोह याची जाण आली

⁎ माहिती गोळा करताना संदर्भाची देवाणघेवाण करु लागल्या.

⁎ देशभक्तीची भावना रुजली

⁎ सादरीकरणाचे कौशल्य वाढले.

⁎ स्पष्टीकरण क्षमता वाढली

⁎ चर्चा करु लागल्या इतिहासातील घटनांची सत्यता तपासू लागल्या

⁎ मी तयार केलेले 80 Video राष्ट्रभाषा हिंदीमध्ये आहेत. Youtube माध्यमातून ते सातारा जिल्ह्यातील 11 तालुक्यातील शिक्षक व विद्यार्थी यांच्या पर्यंत पोहचवते व

माझे गुरुवर्य श्री ता.का. सुर्यवंशी सर यांच्याकडून पूर्ण महाराष्ट्रात व राज्याबाहेर पोचतात हे Video वीरांचे चरित्र त्यांची प्रखर देशभक्ती, बलिदान समाजातील सर्वांसाठी प्रेरक आहेत.

⁎ विद्यार्थीनीनी केलेले 40 Video हे मातृभाषा मराठीतून आहेत ते Youtube च्या माध्यमातून विद्यार्थी व शिक्षकांच्यापर्यंत पोचवत आहोत. स्वातंत्र्यवीरांच्या या गाथा अभ्यासासाठी व विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी उपयुक्त आहेत.

⁎ यातून 40 स्वातंत्र्यवीरांची माहिती मिळते.

⁎ " मदत तंत्रज्ञानाची, गाथा स्वातंत्र्यवीरांची." हा उपक्रम राज्य नव्हे देशातील कोणत्याही शाळेत राबवू शकतो.

## नवोपक्रमाची उद्दिष्टे

* स्वातंत्र्यवीरांचा त्याग, बलिदान त्यांनी भोगलेल्या असीम यातनांच्या बद्दल कृतज्ञतेची व आदरांची भावना वाढीस लावणे.

* इतिहासाची सांगड आधुनिक काळाशी तंत्रज्ञानाच्या मदतीने घालने.

* विद्यार्थीनीचा आदर्श व्यक्तिमत्वांशी परिचय करुन देणे.

* या वीरांनी जोपासलेली जीवनमूल्ये विद्यार्थ्यांना स्वत: मध्ये आत्मसात करण्यात प्रेरित करणे.

* घर, संपत्ती, स्वार्थ या पेक्षा देशहित सर्वोच्यमानण्याची भावना रुजवणे.

* राष्ट्रीय प्रतिक, ऐतिहासिक स्थळे याबद्दल आदराची व सार्थ अभिमानाची भावना वाढीस लावणे.

* सामाजिक जबाबदारी म्हणून स्वातंत्र्यवीरांची गाथा Video रुपात सर्वापर्यंत पोहचवणे.

* इतिहास व वैज्ञानिक दृष्टीकोन यांची सांगड घालून मानवतावाद व जिज्ञासावृत्ती वाढीस लावणे

* विद्यार्थ्यांना तंत्रस्नेही बनवणे.

* मोबाईल तंत्रज्ञानाचा उपयोग ज्ञानाची रचना करण्यासाठी होऊ शकतो याची जाणीव करुन देणे.

* स्वयअध्ययन व सहकार्यातून ज्ञान माहिती मिळवणे.

* सर्व प्रकारचे भेद विसरुन एकोपा व बंधुत्वाची भावना वाढीस लावणे.

* विद्यार्थ्यांच्यात आत्मंविश्वास, प्रामाणिकपणा, साहस, धैर्य सहकारीवृत्ती वाढीस लावणे.

* विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव देणे.

* विद्यार्थ्यांना स्वनिर्मितीचा आनंद देणे.

# नवोपक्रमाचे नियोजन

## 1. उपक्रमपूर्व स्थितीचे निरिक्षण

* इतिहासातील घटना भूतकाळ म्हणून बघत होत्या.

* देशाचा स्वातंत्र्यलढा हा फक्त पाठयपुस्तकातील अभ्यासाचा घटक म्हणून पहात होत्या.

* शालेय परिक्षेतील गुण वाढावे या दृष्टीनेच या विषयाचा अभ्यास केला जात असे.

* कालखंड, चळवळी, सनावळया, घटना या सर्वांमुळे खूप अवघड विषय वाटत होता.

* ऐतिहासिक घटनामागील कारणे देण्यास विद्यार्थी असमर्थ होती.

* संविधानातील समता, एकात्मता हि तत्वे पूरेशी रुजली नाहीत असे वाटले.

* जीवनमुल्ये काय असतात कधी जाणून घ्यायचा प्रयत्न केला नव्हता.

* स्वातंत्र्यात जन्माला आलेल्या या पिढीला पारतंत्र्य, गुलामी यांची जाणीवच झाली नव्हती.

* प्रखर देशभक्ती, साहस, बलिदान, वचनबध्दता या भावनांशी फक्त शब्द या नात्याने जोडलेले होते.

* प्रत्येक्ष जीवनाशी या विषयाची सांगड घातली जात नव्हती.

* ऊदादेवी पासी, वीणा दास, करतारसिंह सराभा, बाघाजतिन, सुनिता चौधरी याव्यक्ती फक्तं नावे एवढीच ओळख होती.

## 2. संबधित व्यंक्तिशी तज्ञांशी चर्चा

मला जाणवलेली अस्वस्थता यातून हा उपक्रम सुचला याबाबत मी मुख्याध्यापिका सौ. विजया पवार यांच्याशी चर्चा केली व परवानगी घेतली त्या स्वत: विज्ञान शिक्षिका असून तंत्रस्नेही आहेत. राज्यास्तरीय नवोपक्रम स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त शिक्षिका सौ. स्वाती मोरे यांच्याशी चर्चा केली माझे गुरुवर्य महाराष्ट्र राज्य हिंदी अध्यापक मंडलचे उपाध्यक्ष व सातारा जिल्हा हिंदी अध्यापक मंडलचे अध्यक्ष श्री ता.का. सुर्यवंशी सर ज्यांना भूतपूर्व राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या करकमलांनी राष्ट्रीय आदर्श शिक्षक

पुरस्कार प्राप्त झाला आहे. सरांच्या मार्गदर्शनाने प्रेरणेने मी हिंदी मधील Video तयार करत आहे. याबाबत त्यांच्याशी चर्चा केली. राज्यात नवोपक्रम स्पर्धेत व्दितीय क्रमांक प्राप्त मुख्याध्यापक श्री विजय कुलकर्णी सर सरस्वती विद्यामंदिर कराड यांनी नियोजन व कार्यवाही बाबत मार्गदर्शन केले पालकसभेत याबाबत पालकांशी चर्चा केली व्यंक्तिमत्व विकासात भर पडणारा हा उपक्रम पालकांनीही उचलून धरला व महत्वाचे म्हणजे विद्यार्थीनींशी चर्चा करुन त्यांना प्रेरित केले.

### 3. आवश्यक साधनांचा विचार

* आवड असणाऱ्या व उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या 40 मुलींची निवड केली.

* प्रथम क्रांतिकारकांची यादी तयार केली. त्याचे फोटो मिळवले.

* माजी इतिहास शिक्षकांच्या व्याख्यानाचे नियोजन केले.

* माझे Video डिजिटल रुममध्ये दाखवण्याची व्यव्यस्था केली.

* तंत्रस्नेही शिक्षकांचे मार्गदर्शनाचे नियोजन केले.

* सातारा जिल्हयातील स्वातंत्र्यवीरांची कात्रणे गोळा केली.

* प्रश्नमंजुषेसाठी प्रश्नावली तयार केली.

* पुस्तके, संदर्भग्रंथ मिळवले.

* महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांचे निवासस्थान **'विरंगुळा'** याला भेट देण्याचे नियोजन

* मुलीच्या समोर माझा एक Video कसा तयार करायचा याचे प्रात्यक्षिक दाखवले


* मुलांना तंत्रस्नेही बनवताना कोणती साधने वापरायची निश्चित केले.

* माझी तंत्रस्नेहीची आवड मुलामध्ये कशी रुजविता येईल याचा विचार केला.

* मोबाईल मधील तंत्रज्ञान App यांची माहिती दिली.

* शाळाभरण्यापूर्वी 10 ते 11 अशी उपक्रमासाठी वेळ निवडली या वेळेत उपक्रम संदर्भातील मुली व मी एकत्र जमत असू.

## 4. करावयाच्या कृतीचा क्रम




⁎ 40 मुलींची निवड -आवड व सहभागी होऊ इच्छिणाऱ्या

⁎ पूर्व चाचणी

⁎ क्रांतीकारकाच्या नावाची यादी फोटो मिळवणे

⁎ माजी इतिहास शिक्षकांचे व्याख्यान: श्री. पाटसुपे बी. एस श्री. शिवाजी विद्यालय कराड यांचे व्याख्यान आयोजित केले. सरांनी सन 1857 च्या स्वातंत्र्यलढयापासून सुरुवात करून आपल्या भारदस्त आवाजात प्रभावी वाणीने राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, मंगल पांडे, बेगम हजरतमहल अशा अनेक वीर योध्दांनी घडवून आणलेला सैनिकांचा

स्वातंत्र्य लढा सांगितला. या व्याख्यानाने राणी लक्ष्मीबाईचे शौर्य, तात्या टोपेंची प्रयत्नांची शिकस्त, मंगल पांडेचा पराक्रम यामुळे मुलींची उत्सुकता कुतूहल वाढले असे वीर योध्दे त्यांच्याविषयी जाणून घ्यायला मुली उत्सुक झाल्या.

* डिजिटल वर्गात मोठया स्क्रीनवर आठवड्यातून 2 वेळा माझे Video दाखवण्याची व्यवस्था केली हे Video जाणीवपूर्वक पाहण्यास सांगितले, कारण यावर आधारित शनिवारी प्रश्न विचारायचे असे नियोजन केले. प्रश्न विचारणार म्हटल्यावर मुली त्यातील माहिती लिहून घेऊ लागल्या सुरुवात राणी लक्ष्मीबाई व तात्या टोपे यांच्या Video ने केली.

* शनिवारी त्यावर प्रश्न विचारले, मुलींनी छान उत्तरे दिली. मुली तयारीनिशी आल्या होत्या मुलींनी त्या व्यक्तिच्या बद्दल आणखी माहिती मिळवली होती ते ही त्यांनी सांगितले.

* दुसरे व्याख्यान- श्री. पवार एन.आर. माजी शिक्षक श्री शिवाजी विद्यालय कराड

सरांनी 1857 नंतर घडलेल्या घटनांचा आढावा घेत एक-एक क्रांती कारक शब्दरुपाने उभा केला वासुदेव बळवंत फडके पासून चाफेकर बंधु, सुर्यसेन, वीणा दास कल्पना दत्त. शचिंद्रनाथ सांन्याल, भगतसिंग, सुखदेव, राजगुरु, करतारसिंह सराभा यांच्या विषयी खूप चांगली माहिती दिली मुली लक्षपूर्वक ऐकत होत्या, प्रश्न विचारत होत्या, त्यांची उत्सुकता वाढता होती. घरी गेल्यावर त्या व्यक्तीसंबंधी माहिती Video त्यांनी पाहिले.

* त्या आठवडयात कोणत्या क्रांतीकारकांचे Video पहायचे त्यांची नावे मुलींनीच सांगितली. Video पाहिले. घरी गेल्यावर इतर क्रांतीकारकांचे ही Video मुलींनी पाहिले व त्याबद्दल वर्गात चर्चा होऊ लागली.

* शनिवारची प्रश्नावली रंगली. मुली स्वत:हुन माहिती सांगू लागल्या.

* पुढच्या आठवडयात महाराष्ट्राचे पाहिले मुख्यमंत्री स्व.मा. यशवंतराव चव्हाण याचे निवास स्थान **विरंगुळा** याला भेट दिली. मुलींनी न सांगता पेन वही सोबत घेतली होती. तेथील वस्तु, फोटो यांचे जागरुकपणे निरीक्षण करत होत्या.

* **वेणुताई स्मृतीसदन भेट**- यामध्ये यशवंतरावांच्या भेटवस्तु त्यांच्या नेहमीच्या वापरातील वस्तु, कपडे, फोटो, त्याचे साल याबाबत जागरुकपणे माहिती घेत होत्या.

विचारत होत्या यशवंतरावाच्या कर्तत्वाने भारावून गेल्या होत्या. त्यांच्याबद्दलच्या आदराची भावना बोलण्यातून जाणवत होती. त्यांची लेखक म्हणून ओळख वेगळीच वाढली त्यांच्या वापरातील पुस्तकांच्या ही मुलींनी नोंद करुन ठेवली.

* या आठवडयतील Video बारकाईने ऐकले त्याबद्दल नोंदी ठेवायला सुरुवात केली. घरी गेल्यानंतर त्यांनी ज्यादाची माहिती शोधायला सुरुवात केली यासाठी मोबाईलचा वापर करु लागल्या. माहितीचे स्त्रोत शोधू लागल्या.

* ग्रंथालयात अशी पुस्तके शोधू लागल्या.

* शनिवारी प्रश्न विचारण्याअगोदरचे त्यांनी मिळवलेली माहिती सांगत होत्या. मग त्यांच्यात दोन गट केले. एक गट प्रश्न विचारी दुसरा उत्तर देई मुली व्यक्त होत होत्या. माहिती शब्दात मांडत होत्या.

* मुलींनी पुढील आठवडयातील Video ही अगोदर पाहिले. या आठवड्यात पाहिलेल्या Video वर प्रश्न-मंजुषेचे आयोजन केले. यासाठी प्रत्येक 5 मुलींचे 8 गट केले. मुली तयारीनिशी आल्या होत्या. इतर शिक्षकांच्या मदतीने प्रश्नमंजुषा घेतली. मुलींचा प्रतिसाद खूप चांगला होता. त्याच्या बोलण्यात, वावरण्यात, आत्मविश्वास जाणवत होता.

* पुढील Video मी वर्गाच्या ग्रुपवर पाठवायला सुरुवात केली व आम्ही एकत्र जमुन त्याविषयी चर्चा करु लागलो.

असे आम्ही ठरवलेले क्रांतीकारक त्यांच्या चरित्राविषयी त्यांच्या देशकार्या विषयी सर्वांना माहिती झाली.

* पुढील आठवडयात निबंध स्पर्धाचे आयोजन केले विषय- **'माझा आवडता क्रांतीकारक'** मुलीनी अतिशय माहितीपूर्ण असे निबंध लिहलेले जाणवले त्यातून नंबर दिले.

* 9 ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धाचे आयोजन केले.

* मुली चर्चे दरम्यान आपली मते मांडत होत्या माहिती सांगत होत्या त्याचा फायदा त्यांना या स्पर्धेवेळी झाला. मुलीचा आत्मविश्वास, वीरांच्या बद्दलचा आदर जाणवत होता.

* 15 ऑगस्ट स्वातंत्र्यदिन या निमित्ताने क्रांतीकारक नेते यांच्या वेशभूषा करणे व 2 मि त्यांच्या विषयी बोलणे ज्यातून थोडक्यात त्या व्यक्तीची ओळख होईल. मुलींनी ड्रेपरी गोळा केली माहिती गोळा केली. मुलींनी 36 स्वतंत्रतासेनानी साकारले त्या दिवशी या मुली स्टेजवर वेशभूषेत उपस्थीत होत्या. मुलीचा आत्मविश्वास बोलण्यातून जाणवत होता.

* कला शिक्षकांच्या मदतीने सातारा जिल्ह्यातील स्वतंत्रता सेनानीची माहिती पेपरमध्ये येत होती तिची कात्रणे गोळा करुन 75 स्वातंत्र्यवीरांची माहितीच्या कात्रणाचे प्रदर्शन भरवले.

* मुलींच्या ज्ञानात भर पडली स्वातंत्र्यलढ्या बद्दल आत्मीयतेची भावना निर्माण झाली.

* **तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन-** श्री अशोक सदावरे, M.CA, M.Phil. यांनी मुलींना वेगवेगळया App ची माहिती प्रात्यक्षिकांसह सांगितली.

* ज्या मुलींना तंत्रज्ञानाविषयी माहिती होती त्यानीही ती सर्वांना सांगितली.

* Video साठी 1 क्रांतीकारक मुलीनी स्वत: निवडले.

* त्या व्यक्तीसंबधी पुस्तके इंटरनेट या माध्यमातून माहिती गोळा केली त्याचे सुत्रबध्दलेखन केले.

* रेकॉडिंग- मोबाईलवर मुलींनी आपल्या आवाजात रेकॉर्ड केले या कामी कुटूंबियाची मदत घेतली उच्चारण दोष घालवण्यासाठी 2-3 वेळा रेकॉडिंग करावे लागले.

* त्या व्यक्तिचे फोटो डाऊनलोड करुन Inshot, VN, Kinemaster App वापरले व Video तयार झाले. काहीनी लवकर केले इतरांच्या मदतीने केले. काही विद्यार्थींना वेळ लागत होता इतर मुलींनी त्यांना मदत केली.

### 5. उपक्रमोत्तर स्थितीचे निरिक्षणे

* मुलींनी यशस्वीरित्या 40 Video तयार केले.

* मी करु शकेन का? या प्रश्नाकडून मी करुन दाखवले यातील आनंद, उत्साह मुलीच्यात जाणवत होता.

* मुलीच्यात स्वयंअध्ययनातून शिकणे यामुळे आत्मविश्वास आला.

⁕ एकमेकांना मनापासून सहकार्य करु लागल्या, कोणतेही काम सहकार्यातून सहज पूर्ण करु शकतो याची जाणीव झाली.

⁕ निबंधस्पर्धा, वक्तृत्वस्पर्धामधील सहभाग वाढला.

⁕ आपले मत योग्य शब्दांत मांडू लागल्या.

⁕ नेत्याच्या जयंत्या, पुण्यतिथी कार्यक्रमात आनंदाने व आदरांच्या भावनेने सहभागी होऊ लागल्या

⁕ नविन माहिती मिळवण्याचे वेगवेगळे स्त्रोत माहित झाले.

⁕ राष्ट्रीय प्रतिक, ऐतिहासिक स्थळे याबद्दल सार्थ अभिमान व आदर जाणवू लागला.

⁕ वर्गातील सर्व उपक्रमात सहभागी होऊ लागल्या

⁕ इतिहास विषयाबद्दल आवड निर्माण झाली.

⁕ भारताच्या स्वातंत्र्यलढयाविषयी उत्साहाने बोलू लागल्या

⁕ ज्या विद्यार्थीनी वर्गात शांत बसून राहायच्या त्या बोलक्या झाल्या वाचनाची सवय लागली

⁕ निरिक्षण करु लागल्या.

## 6. कार्यवाहीचे टप्पे

**"मदत तंत्रज्ञानाची, गाथा स्वातंत्र्यवीरांची".**

या नवोपक्रमाचा कालावधी 15 जून ते नोव्हेंबरअखेर करावयाच्या कृतींचा क्रम-

यासाठी नववीच्या 40 विद्याथीनी निवडल्या

1. पूर्वज्ञानावर आधारित पूर्व चाचणी (1 दिवस)

2. विद्यार्थीनीना उपक्रमाची माहिती व नियोजन सांगितले (1 दिवस)

3. स्वातंत्र्यवीरांच्या नावाची यादी व फोटो जमा केले (3 दिवस)

4. माजी इतिहास शिक्षक व्याख्यान- 1. श्री पाटसुपे बी.एस (1 दिवस)

2. श्री पवार एन. आर (1 दिवस)

4. माझे Video दाखवणे (आठवड्यातून 2 वेळा)

5. Video मधील स्वातत्र्यवीरा वर चर्चा- (2 दिवस)

5. ऐतिहासिक स्थळांना भेट 1. विरंगुळा- (1 दिवस)
2. वेणुताई स्मृतिसदन (1 दिवस)

6. सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्यवीरांच्या कात्रणाचा संग्रह (1 आठवडा)

7. कात्रणाचे प्रदर्शन शाळेतील सर्वच मुलींना लाभ (2 दिवस)

8. Video वरील चर्चा (प्रत्येक आठवडयात 2 दिवस)

9. प्रश्नमंजुषा (1 दिवस)

10. मुलीकडून प्रश्नावली Video बाबत (1 आठवडा)

11. याप्रमाणे प्रत्येक स्वातंत्र्यवीराची माहिती घेतली (2 महिने)

12. तंत्रस्नेही शिक्षकांचे मार्गदर्शन (1 दिवस)

13. Video कसा तयार करायचा त्याबद्दल चर्चा मार्गदर्शन (1 दिवस)

14. Video साठी माहिती गोळा करणे व लेखन (1 आठवडा)

15. निबंधलेखन स्पर्धा (1 दिवस)

16. वक्तृत्व स्पर्धा (1 दिवस)

17. Video साठी रेकॉर्डिग (4 दिवस)

18. स्वातंत्र्यवीरांची वेशभूषा व स्वागत. 15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिन (1 दिवस)

19. Video निर्मिती (1 आठवडा)

20.Video Youtube ला अपलोड करणे (4 दिवस)

21. अंतिम चाचणी (1 दिवस)

## 7. उपक्रमासाठी इतरांची मदत

- ❖ हा नवोपक्रम करताना मुख्य म्हणजे ज्यांच्यासाठी हा उपक्रम केला त्या विद्यार्थीनीचीच महत्वाची मदत झाली मुलीचा उत्साह खूप जाणवला.
- ❖ हा उपक्रम माझ्या अस्वथतेतून निर्माण झाला. त्याचे यश पहाता मुख्याध्यापिकांच्या आग्रहावरुन तो या स्पर्धेसाठी पाठवला.
- ❖ या कामी इतिहास व मराठी विषयाच्या शिक्षकाचे सहकार्य लाभले. आमचे तंत्रस्नेही शिक्षक आम्हाला वेळोवेळी मदत करत होते.
- ❖ श्री शिवाजी शिक्षण संस्था, ट्रस्ट कराडचे अध्यक्ष व सचिव श्री जयंतकाका पाटील व संचालक श्री प्रकाशबापू पाटील यांनी उपक्रमाचे खूप कौतुक केले. त्यांनी माझे प्रत्येक Video ऐकले आहेत व आम्हालाही या वीरांच्या बद्दल ऐवढी माहिती प्रथमच ऐकायला मिळाली अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. सर्व संचालक मंडळानेही उपक्रमासाठी प्रोत्साहन दिले.
- ❖ सर्वात महत्वाचे म्हणजे माझे गुरुवर्य पितामह श्री ता. का. सुर्यवंशी सर यांचे मोलाचे मार्गदर्शन यासाठी लाभले.

## 8. नवोउपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे










वक्तृत्व स्पर्धा







# 5. नवोपक्रमाची कार्यपध्दती

## 1. पूर्वस्थितीची निरिक्षणे व त्याची नोंदी

* शाळेचे वर्षभराचे एक विशिष्ट नियोजन असते, विद्यार्थी अडकून जातात. मुक्त शिक्षण व आवडीप्रमाणे शिक्षण घेणे याचा विद्यार्थी व पालक विचार करत नाहीत.

* शिक्षक व विद्यार्थी यामध्ये नेहमीच ठराविक अंतर जाणवते.

* अवांतर वाचनापासून विद्यार्थी दूर असल्याचे जाणवते.

* समाजसुधारक नेते व क्रांतिकारक यांच्यात फरक लक्षात येत नव्हता.

* इतिहास म्हणजे भूतकाळातील घटना असा समज आहे.

* अवघड व किचकट विषय म्हणून इतिहासाबाबत धारणा.

* वक्तृत्व स्पर्धामध्ये सर्वात कमी प्रतीसाद.

* ऐतिहासिक निबंध स्पर्धामध्ये सर्वात कमी प्रतिसाद.

* इतिहासातील गुण नेहमीच कमी जावणत होते.

* **"पूर्वजांचे स्मरण म्हणजे कर्तृत्वाच्या प्रेरणेचा अखंड स्त्रोत"**. त्यांच्या जीवनचरित्रातून नेहमीच बोध आणि मार्गदर्शन मिळते या गोष्टी पासुन विद्यार्थी वंचित रहात होते.

* जगाला मार्गदर्शक असणारी भारतीय संस्कृती त्यापासून आपलीच पुढची पिढी वंचित रहात होती याची जाणीव झाली.

## 2. कार्यवाही दरम्यान निरिक्षणे व माहिती संकलन

1. नेहमीपेक्षा वेगळे काही करुन दाखवयाचे हा उत्साह व कुतूहल मनात होते.

2. पाठ्यपुस्तकातील मोजक्या नावाव्यतिरिक्त इतर क्रांतीकारकांची नावे प्रथमच ऐकत होत्या त्यांचे फोटो जमा केल्यानंतर ही सामान्य व्यक्ती प्रमाणे दिसतात, मग ऐवढा पराक्रम कसा केला? याबाबत कुतुहल जागे झाले?

3. व्याख्यानातून Video च्या माध्यमातून हया प्रत्येक व्यक्तीबद्दल मिळणारी माहिती त्यांना अचंबित करत होती. अजून जाणून घ्यायची उत्सुकता वाढू लागली.

4. या व्यक्तिरेखांची जिद्द चिकाटी, साहस, देशभक्ती, त्यांचा त्याग, बलिदान यानी भारावून गेल्या.

5. आपआपसात चर्चा करु लागल्या.

6. संदर्भ, पुरावे तपासू लागल्या.

7. पारतंत्र्याची परिस्थिती इंग्रजाचे अत्याचार, त्यांना झालेल्या कठोर शिक्षा याच्यांशी भावनिकदृष्टया जोडल्या जाऊ लागले.

8. विद्यार्थी मुळातच संवेदनशील असतात त्यामुळे या व्यक्तीरेखाशी जोडल्या गेल्या आपलेपनाची भावना निर्माण झाली.

9. त्यांच्याविषयी वर्गात, घरी, मित्रमैत्रिणीत चर्चा करु लागल्या. प्रश्न विचारु लागल्या.

10. हा माझ्या देशाचा स्वातंत्र्यलढा आहे. माझ्या देशासाठी यांनी त्याग बलिदान केला. ही आपलेपणाची भावना निर्माण झाली.

11. त्यांच्यासाठी कृतज्ञतेची व आदराची भावना निर्माण झाली.

12. अशा महान व्यक्तीरेखाबद्दल आणखी जाणून घेवू लागल्या.

13. माहितीचे स्त्रोत शोधू लागल्या

14. माहिती संकलित करु लागल्या ती इतरांना सांगु लागल्या, ऐकू लागल्या

15. प्रत्येक स्वातंत्र्यवीरांची माहिती जाणून घेण्यास उत्सुक होत्या.

16. मित्र-मैत्रिणी, पालक, बहिण-भाऊ त्यांना अभिमानाने सांगू लागल्या

17. त्यांची जीवनमूल्ये त्यांनी कशी आत्मसात केली, आपणही असेच झाले पाहिजे.

18. देशहित व देशप्रेमाची भावना वाढीस लागली

19. देशाची प्रतिके ऐतिहासिक स्थळे याबद्दल सार्थ अभिमान वाटू लागला. जपणूक करण्याची भावना वाढीस लागली.

20. एक एक क्रांतिकारकांची माहिती गोळा करु लागल्या

21. प्रश्नमंजूषा, चर्चाद्वारे त्या सांगू लागल्या, व्यक्त होऊ लागल्या.

22. इतरांनीही यांच्याबद्दल कृतज्ञतेची व आदराची भावना बाळगावी यासाठी प्रयत्न करु लागल्या

23. एक व्यक्तीरेखा निवडून त्यांच्याबद्दल जास्तीत जास्तं माहिती मिळवली.

24. माहितीचे मुद्देसुद लेखन केले.

25. स्वत:च्या आवाजात रेकॉडिंग करुन Video तयार केले.

26. माझा Video सर्वोत्कृष्ठ कसा होईल यासाठी पूर्ण ताकदीने प्रयत्न करु लागल्या

27. तंत्रज्ञान आत्मसात केले. शिकण्याची गती वाढली.

28. चुका झाल्यातरी निराश न होता प्रयत्नं करत होत्या.

29. शिक्षक कुटुंबिय मित्र-मैत्रिणी यांची मदत घेत होत्या

30. सहकार्याने एकजूटीने काम करण्याची सवय लागली

31. लेखनशैली सुधारली यात एकमेकींना मदत केली

32. उच्चार, विरामचिन्ह यांचे भान ठेवून उच्चारण करणे याबाबी जाणवू लागल्या सांगू लागल्या.

33. काही मुली तंत्रज्ञान इतरांना समजून सांगू लागल्या

34. वर्गात एकजूट, समुहभावना वाढीस लागली.

35. क्रांती दिन 15 ऑगस्टं या दिवशी त्यांच्यातील आत्मविश्वास सर्वांना जाणवला.

36. व्यंक्तिरेखेची वेशभूषा करताना, त्यांच्या बद्दल बोलताना बारकावे काटेकोरपणे लक्षात ठेवत होत्या इतरांनाही त्याची जाणीव करुन देत आहे.

37. आपला इतिहास अनमोल ठेवा आहे व तो जपण्याची जबाबदारी आपल्यावरच आहे याची जाणीव त्यांच्या शब्दातून प्रकट होत होती.

38. माझा उपक्रम यशस्वी झाला याची जाणीव मला व माझ्या सहकारी शिक्षकांना झाली

## ३. उपक्रम पूर्ण झाल्यावर निरिक्षणे व त्यांची नोंदी

⁎ निबंधस्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेतील या 40 मुलींचे यश लक्षणीय होते.

⁎ त्यांनी लिहलेले निबंध त्यांच्या राष्ट्रीय भावनेचे दयोतक आहेत.

⁎ प्रत्येक काम पूर्ण श्रध्देने करायचे याची सवय लागली.

⁎ त्याचे इतिहास विषयातील गुण वाढलेच, त्याबरोबर इतर विषयातील गुणातही चांगली वाढ झाली.

⁎ शालेय कार्यक्रमात या मुलीची उपस्थिती जास्त होती.

⁎ खेळ, क्रिडाप्रकारात ही या मुलीचे यश सर्वात जास्त होते, त्यांचा आत्मंविश्वास वाढल्याचे हे प्रतिक होते.

⁎ विद्यार्थीनीनी तयार केलेले 40 Video त्यांच्या सर्जनशीलतेचे प्रतिक आहे.

⁎ प्रत्येक Video इतरांपेक्षा वेगळा आहे.

⁎ हा Video त्यांनी कुटुंब मित्र-मैत्रिणी नातेवाईक या सर्वापर्यंत पोचवले त्यांनी प्राप्त केलेली माहिती त्यांनी सर्वांच्या पर्यंत पोचवली.

⁎ आदराची कृतज्ञतेची भावना व देशप्रेम त्यांच्यात रुजले व ते इतरांच्यात रुजवण्याचा प्रयत्न करत आहेत.

⁎ 40 Video व माझे 80 Video हे इतिहास एक उत्तम शैक्षणिक साधन या उपक्रमातून तयार झाले.

⁎ या Video चा उपयोग इतर शाळातील शिक्षक व विद्यार्थी अध्यापनासाठी करु शकतात.

⁎ ज्ञात-अज्ञात अशा 40 स्वातंत्र्यवीरांच्या चरित्राची माहिती झाली

⁎ वर्गातील चर्चाचे विषय बदलले.

* नवीन काही करण्याचे कुतूहल व उत्साह जागा झाला. त्यांच्यापुढे आदर्श निर्माण झाले त्या विषयी बोलू लागल्या.

## 4. कार्यवाहीत आलेल्या अडचणी

* आम्ही शाळेच्या वेळेपूर्वी 10 ते 11 एकत्र जमत असू पण काही वेळा आमची चर्चा संपत नसे. अशा वेळी त्या वर्गाचे सर्व ऑफ तास मला लावावे असे पर्यवेक्षकांना सांगुन ठेवले.

* Video दाखवण्यासाठी डिजिटल वर्गात बसणे आवश्यक होते तेथे बसणारा वर्ग आम्ही 9 B मध्ये स्थलांतारित केला.

* आमची व्याख्याने शनिवारी शाळा सुटल्यानंतर आयोजित करत होतो. त्यामुळे पालकांना विद्यार्थ्यांना घरी घेऊन जायची वेळी सोय करावी लागे.

* मंगळवारी लाईट गेली की आमचा Video दाखवणे रद्द करावे लागे. तो दुसऱ्या दिवशी दाखवत होतो.

* मुली स्वातंत्र्यवीरांच्या उपक्रमात खूपच रमल्या आहेत अशी सहकारी शिक्षकाकडून सुचना येऊ लागल्या.

* घरातून पालकांचा प्रतिसाद कमी होता, कारण मुली याउपक्रमाला पालकांचाच मोबाईल वापरत होत्या.

*शब्दांच्या उच्चारणाकडे विशेष लक्ष द्यावे लागे, उच्चारण चुकले की पुन्हा पुन्हा रेकॉर्डिंग करावे लागे.

* काही विद्यार्थीनीची तंत्रज्ञान शिकण्याची गती चांगली होती तर काहीची खूप कमी अशा वेळी वारंवार सांगावे लागे प्रात्यक्षिक दाखवावे लागे.

* तंत्रज्ञानात प्रगत मुली अशावेळी सर्वांना मदत करत.

* काही मुली चुका आल्यावर लगेच निराश होत होत्या. प्रोत्साहित करावे लागले.

## माहितीचे विश्लेषण व तक्ते


**श्री शिवाजी शिक्षण संस्था, ट्रस्ट कराडचे**


**विठामाता विद्यालय, कराड**

| **अ.नं** | **विद्यार्थीनीचे नाव** | **पुर्वचाचणी** | **अंतिम चाचणी** | **प्रश्नमंजूषा गट व निकाल** |
|---|---|---|---|---|
| 1 | सानिका नागनाथ देशमुख | 11 | 20 | **गट-1** द्वितीय क्रमांक |
| 2 | श्रृती प्रकाश सुर्यवंशी | 05 | 19 | |
| 3 | श्रद्धा मुकेश कोरडे | 10 | 20 | |
| 4 | सृष्टी गणेश पाटील | 11 | 20 | |
| 5 | निलोफर मुराद मुल्ला | 06 | 20 | |
| 6 | आदिती मारुती पवार | 10 | 19 | **गट-2** तृतीय क्रमांक |
| 7 | मयुरी सतीश शिंदे | 11 | 20 | |
| 8 | रिध्दी जयप्पा हिप्पलगार | 09 | 19 | |
| 9 | दिया विशाल कांबळे | 08 | 20 | |
| 10 | आदिती निलेश कुंभार | 06 | 19 | |
| 11 | आलिशा अकिल संदे | 09 | 20 | **गट-3** |
| 12 | अंकिता पांडूरंग चव्हाण | 10 | 20 | |
| 13 | अर्चिता रामचंद्र मस्करं | 07 | 20 | |
| 14 | वैष्णवी शंकर चव्हाण | 10 | 20 | |
| 15 | श्रीमई अशोक तावदर | 08 | 19 | |
| 16 | आर्या आनंदराव मते | 06 | 18 | **गट-4** प्रथम क्रमांक |
| 17 | अक्षता उत्तम कारंडे | 11 | 20 | |
| 18 | श्रावणी सुरेश फडतरे | 11 | 20 | |
| 19 | रिया विजय कुंभार | 09 | 20 | |
| 20 | मनस्वी विनायक कदम | 11 | 20 | |
| 21 | रुचिका सतिश भोंगाळे | 11 | 20 | **गट-5** |
| 22 | प्रिया सुनिल पाटील | 05 | 19 | |
| 23 | खालीया साजिद मुलाणी | 07 | 18 | |
| 24 | सिफा मुनवर मुलाणी | 06 | 20 | |
| 25 | विरजा प्रताप चव्हाण | 06 | 18 | |
| 26 | सिध्दी सचिन पाटील | 10 | 19 | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 27 | आर्या प्रकाश पाटील | 06 | 20 | |
| 28 | भक्ती प्रकाश सुर्यवशी | 08 | 20 | |
| 29 | समिक्षा एकनाथ शेवाळे | 06 | 20 | **गट**-6 |
| 30 | स्नेहाकिता प्रमोद देशमुख | 05 | 20 | |
| 31 | प्राजक्ता सतिश पवार | 06 | 19 | |
| 32 | अनुजा शंकर पाटील | 06 | 20 | |
| 33 | सिद्धी संजय भंडारे | 07 | 20 | |
| 34 | अनुष्का आनंद शिंदे | 06 | 20 | **गट**-7 |
| 35 | आलिया समीर मुल्ला | 06 | 20 | |
| 36 | श्रध्दा तोरस्कर | 06 | 20 | |
| 37 | तहुरा अमजद अरब | 05 | 15 | |
| 38 | शरयु पंकज निकम | 05 | 15 | **गट**-8 |
| 39 | तेजस्विनी राजमाने | 06 | 19 | |
| 40 | सिध्दी संजय सावंत | 05 | 19 | |

| **पूर्व चाचणी** | | | | |
|---|---|---|---|---|
| **पूर्वचाचणी** | | **अंतिम चाचणी** | | |
| **गुण** | **विद्यार्थी संख्या** | **टक्केवारी** | **विद्यार्थी संख्या** | **टक्केवारी** |
| 0 ते 05 | 06 | 54% | 00 | 00 % |
| 06 ते 10 | 27 | 63% | 00 | 00 % |
| 11 ते 15 | 07 | 63% | 02 | 18 % |
| 16 ते 20 | 00 | 00 | 38 | 342 % |



## 6. नवोपक्रमाची यशस्विता

विद्यार्थीनी खालील स्वातंत्रवीराचे Video तयार केले.

| अ.नं | विद्यार्थीनीचे नाव | निवडलेला क्रांतीकारक |
|---|---|---|
| 1 | सानिका नागनाथ देशमुख | स्वातंत्र्यवीर सावरकर |
| 2 | श्रृती प्रकाश सुर्यवंशी | सरदार अजितसिंह |
| 3 | श्रद्धा मुकेश कोरडे | अनंत लक्ष्मण कान्हेरे |
| 4 | सृष्टी गणेश पाटील | राणी लक्ष्मीबाई |
| 5 | निलोफर मुराद मुल्ला | नाना पाटील |
| 6 | आदिती मारुती पवार | सेनापती बापट |
| 7 | मयुरी सतीश शिंदे | भगतसिंग |
| 8 | रिध्दी जयप्पा हिप्पलगार | मदनलाल धिंग्रा |
| 9 | दिया विशाल कांबळे | लोकमान्य टिळक |
| 10 | आदिती निलेश कुंभार | मंगल पांडे |
| 11 | आलिशा अकिल संदे | झलकारी बाई |
| 12 | अंकिता पांडूरंग चव्हाण | ऊदादेवी पासी |
| 13 | अर्चिता रामचंद्र मस्कर | जतींद्रनाथ मुखर्जी |
| 14 | वैष्णंवी शंकर चव्हाण | कॅ. लक्ष्मी सहगल |
| 15 | श्रीमई अशोक तावदर | तात्या टोपे |
| 16 | आर्या आनंदराव मते | भगतराम तलवार |
| 17 | अक्षता उत्तम कारंडे | सुनीता चौधरी |
| 18 | श्रावणी सुरेश फडतरे | वासुदेव बळवंत फडके |
| 19 | रिया विजय कुंभार | चंद्रशेखर आझाद |
| 20 | मनस्वी विनायक कदम | बिरसा मुंडा |
| 21 | रुचिका सतिश भोंगाळे | सचिंद्रनाथ सान्याल |
| 22 | प्रिया सुनिल पाटील | सुर्यसेन |
| 23 | खालीया साजिद मुलाणी | शांती घोष |
| 24 | सिफा मुनवर मुलाणी | नेताजी सुभाषचंद्र बोस |
| 25 | विरजा प्रताप चव्हाण | ठाकूर रोशनसिंह |
| 26 | सिध्दी सचिन पाटील | चाफेकर बंधू |
| 27 | आर्या प्रकाश पाटील | राघोजी भांगरे |
| 28 | भक्ती प्रकाश सुर्यवशी | खुदीराम बोस |
| 29 | समिक्षा एकनाथ शेवाळे | प्रितिल्ला वड्डेदार |

| | | |
|---|---|---|
| 30 | स्नेहाकिता प्रमोद देशमुख | वीना दास |
| 31 | प्राजक्ता सतिश पवार | सुखदेख थापर |
| 32 | अनुजा शंकर पाटील | शिरिष कुमार |
| 33 | सिद्धी संजय भंडारे | श्यामजी कृष्ण वर्मा |
| 34 | अनुष्का आनंद शिंदे | अशफाक उल्लाह खान |
| 35 | आलिया समीर मुल्ला | सुखदेव थापर |
| 36 | श्रध्दा तोरस्कर | जानकी थेवर |
| 37 | तहुरा अमजद अरब | कल्पना दत्त |
| 38 | शरयु पंकज निकम | पंडित रामप्रसाद बिस्मिल |
| 39 | तेजस्विनी राजमाने | करतारसिंह सरभा |
| 40 | सिध्दी संजय सावंत | शिवराम हरी राजगुरु |

**निबंध स्पर्धा निकाल**

1. श्रावणी सुरेश फडतरे
2. मनस्वी विनायक कदम
3. समिक्षा एकनाथ शेवाळे

**वक्तृत्व स्पर्धा निकाल**

1. देशमुख सानिका नागनाथ
2. सृष्टी गणेश पाटील
3. श्रद्धा मुकेश कोरडे

## प्रश्नमंजुषा निकाल

| प्रथम - गट क्रमांक 4 | व्दितीय - गट क्रं 1 | तृतीय - गट क्रं 2 |
|---|---|---|
| 1. आर्या आनंदराव मते | 1. सानिका नागनाथ देशमुख | 1. आदिती मारुती पवार |
| 2. अक्षता उत्तम कारंडे | 2. श्रुती प्रकाश सुर्यवंशी | 2. मयुरी सतिश शिंदे |
| 3. श्रावणी सुरेश फडतरे | 3. श्रद्धा मुकेश कोरडे | 3. रिध्दी जयप्पा हिप्पलगार |
| 4. रिया विजय कुंभार | 4. सुष्टी गणेश पाटील | 4. दिया विशाल कांबळे |
| 5. मनस्वी विनायक कदम | 5. निलोफर मुराद मुल्ला | 5. आदिती निलेश कुंभार |

## नवोपक्रमाची फलनिष्पत्ती

* हा नवोपक्रम एक सामाजिक जबाबदारी पार पाडली या दृष्टीने महत्वाचा आहे.

* 40 मुली तंत्रस्नेही झाल्या.

* मुलींनी तयार केलेले 40 Video व माझे 80 Video हे स्वातंत्र्यलढ्यातील या वीरांचे कार्य समाजापर्यंत पोचवण्याचे चांगले माध्यम बनले.

* ज्ञात- अज्ञात अशा वीरांची थोडक्यात चरित्रे समाजापर्यंत पोहचवण्याचे महत्त्वाचे काम या उपक्रमाच्या माध्यामातून झाले.

* या उपक्रमाच्या निमित्ताने स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास हा गाभा घटक मुलीच्या माध्यमातून घराघरात पोहचला

* स्वातंत्र्यलढयातील या वीरांच्या बद्दल कृतज्ञतेची व सार्थ अभिमानाची भावना वाढीस लागली.

* तंत्रज्ञानाच्या मदतीने स्वयअध्ययनातून माहिती मिळवली व Video निर्मिती केली.

* इतिहासाची सांगड मनोरंजनाच्या माध्यमातून आधुनिक काळाशी घातली गेली.

* विद्यार्थीनींचे अवांतर वाचन वाढले त्याची गोडी लागली.

* विद्यार्थीनीना सामाजिक भान आले. आपण एक जबाबदार नागरिक आहोत याची जाणीव झाली.

* लेखन कौशल्य सुधारले मुद्देसुद लेखनांची सवय लागली.

* स्वमत अभित्यक्ती चांगल्या प्रकारे होऊ लागली.

* इतिहास क्लिष्ट कंटाळवाणा न राहता आवडीचा विषय बनला.

* मुलींचा आत्मविश्वास वाढला सहजरित्या काम करण्याची सवय लागली.

* शालेय चाचणी सत्र परीक्षा गुणामध्ये ही चांगली वाढ झाली.

* सहकारी वृत्ती वाढली. एकजूटीने काम करण्याची सवय लागली.

⁎ वर्गाच्या शाळेच्या सर्व उपक्रमात आवर्जुन भाग घेऊ लागल्या.

⁎ शिक्षक विद्यार्थी संबंध सुधारले ते जिव्हाळयाचे व सलोख्याचे झाले.

⁎ स्वयंअध्ययनातून, शिकण्याचा आनंद मिळाला गोडी लागली.

⁎ मोबाईल मधील तंत्रज्ञानाचा उपयोग ज्ञानाची रचना करण्यासाठी होऊ शकतो याची जाणीव झाली.

⁎ मुली तंत्रस्नेही झाल्या आपल्या प्राप्त ज्ञानाचा उपयोग इतर कामासाठी करु लागल्या.

⁎ मुलींच्यात जीवनमूल्ये रुजण्यास मदत झाली.

⁎ व्यक्तिमत्वविकास भर पडली आत्मविश्वास वाढला

मी माझे गुरु पितामह ता. का. सुर्यवंशी सर यांच्या मार्गदर्शनाने 80 video राष्ट्रभाषा हिंदीमध्ये तयार केले ते What'up च्या माध्यमातून संपूर्ण सातारा जिल्हयातील 11 तालुक्यातील शिक्षक विद्यार्थ्यांपर्यत पोचतात. सर ते संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयात पोहचवतात या माध्यमातून ही स्वातंत्र्यवीरांची गाथा आपल्या राज्यात सर्वत्र पोचते व त्यातून उद्‌बोधनाचे एक चांगले सामाजिक कार्य घडत आहे.

⁎ हे Video हिंदीत असल्यामुळे देशातील सर्व शिक्षक विद्यार्थी व समाजासाठी स्वातंत्र्यवीरांची गाथा पोचवण्यसाठी उपयुक्त आहेत.

⁎ **'आधी केले, मग सांगितल.'** विद्यार्थीनी कडून करुन घेतले त्यांना मार्गदर्शन केले त्यांचे 40 Video मातृभाषा मराठीतून केले.

⁎ महाराष्ट्रातील शिक्षक व विद्यार्थ्यांना प्रेरित करणारे आहेत.

⁎ मी राबवलेला हा उपक्रम सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून केला गेला आहे तो देशात कोठेही राबवला जाऊ शकतो.

# समारोप

"मदत तंत्रज्ञानाची गाथा स्वातंत्र्यवीरांची" हा उपक्रम नववीच्या विद्यार्थीनीसाठी राबवताना खूप समाधान वाटले. कारण शिक्षण घेत असताना प्रत्येक विषय हा एकमेंकाशी निगडीत असतो. स्वातंत्र्यचळवळीचा इतिहास जाणणे हा गाभा घटक मुलाच्या व्यक्तीमत्वात जीवनमुल्ये रुजवण्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. जो समाज इतिहास विसरतो तो अस्तित्वहीन होतो. याला इतिहासचे साक्ष आहे.

भारताच्या सुजाण नागरिकामध्ये जी जीवनमूल्ये आवश्यक आहेत ती काही अंशी या उपक्रमातून नक्कीच साध्य झाली आहेत. विद्यार्थ्यांच्यामधील उत्सूकतेला चालना देऊन स्वातंत्र्य लढयातील या वीरांनी देशासाठी केलेला स्वार्थत्याग, बलिदान त्यांची चरित्र्याच्या माध्यमातूनया नव्या पिढीपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न आहे. त्यातून या वीरांच्या बद्दल आदराची व कृतज्ञतेची भावना वाढीस लागली.

माझ्या देशाचा स्वातंत्र्यलढा त्यातील या व्यक्तिरेखाशी विद्यार्थीनी भावनिक दृष्ट्या जोडल्या गेल्या. संवेदनशील मनावरील हे देशभक्ती, देशप्रेमाचे संस्कार चिरकाल टिकणारे असतील यात शंका नाही.

स्वातंत्र्यासाठी या वीरांनी दिलेले मोल या पिढीला नक्कीच जाणवेल. या उपक्रमाच्या माध्यमातून 40 मुली तंत्रस्नेही झाल्या. माझे 80 Video व मुलीचे 40 मातृभाषेतील Video समाजातील सर्व स्तरातील लहान थोरांसाठी माहितीपुर्ण व शैक्षणिक व समाज प्रबोधनात्मक आहेत. व देश प्रेमाची भावना वाढीस लावणारे आहेत.

मला या उपक्रमात सहभागी झाल्यामुळे खूप काही शिकायला मिळाले व माझा हा उपक्रम यशस्वी झाला असे मला वाटते.

विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनातून कृतीयुक्त शिक्षण मिळाले हे शिकणे आनंददायी व स्फुर्तिदायक होते. वीरांची गाथा सांगताना Video तयार करताना त्यांच्या चेहऱ्यावरील नवनिर्मितीचा आनंद ओसंडून वाहत होता. यातच या उपक्रमाचे सार्थक झाल्याचे मला वाटते.

धन्यवाद.

**मुलींनी तयार केलेले Video लिंक**

HINDI RASHTRABHASHA चॅनेल

1. https://youte.be/FTepsuou-cl
2. https://youte.be/Gui4zUgWGJM
3. https://youte.be/uDZoV6mKJWE
4. https://youtu.be/08\/Z5srx95s
5. https://youtu.be/1-kXHYGPvQQ
6. https://youtu.be/Ext-CRBDZSo
7. https://youtu.be/Y3N777vM5nS
8. https://youtu.be/GetN2-omZAw
9. https://youte.be/7VuBYhf1L-Q
10. https://youte.be/CCNM4n2mbQA

याप्रमाणे 40 Videos

**मी तयार केलेले Video लिंक**

1. https://youtu.be/WW+BuIX6TCE
2. https://youtu.be/CY7Q+yNFU4M
3. https://youtu.be/wff6K4sWckU
4. https://youtu.be/JB9ttTkRp9w
5. https://youtu.be/BzCbTLbgJLM
6. https://youtu.be/Ouct93DUtkl
7. https://youtu.be/PwlnwynvrOl
8. https://youtu.be/22UbyP8MZTA
9. https://youle.be/JJ8Pwo0jaQ8
10. https://youte.be/wXxaGCd4Ruo

याप्रमाणे 80 Videos

महाराष्ट्र राज्य हिंदी शिक्षक महामंडल से संलग्न

# सातारा जिला हिंदी अध्यापक मंडल

(पंजीकरण क्रमांक : महाराष्ट्र/४३७०/सातारा २०-१०-९५)

'राष्ट्रभाषा भवन', बारवकर नगर, संभाजी नगर, सातारा-४१५००४, दूरभाष : (०२१६२)२४८९६६

• अध्यक्ष :
श्री.ना. का. सूर्यवंशी
सातारा, मो :९४२३०३२१४५

• उपाध्यक्ष :
श्री. वि.कृ.इनामदार
सातारा, मो ९८२२८२२०३८
श्री. इ.यु.मुल्ला
कराड, मो :९४२३८२७५९७
श्री. मुजावर श.ई.
पाटण, मो :९८८९१९०५७८

• कार्यवाह :
श्री. अ.स.यादव
वजरोशी मो.:९५६११२६७३१

• कोषाध्यक्ष :
श्री. मा. ह. घोरपडे
सातारा मो.:९८२३३४९८२३

• सहकार्यवाह :
सौ. सु. मा. शिवदास
करंजे, सातारा.
मो.:९९२११०३५९४
श्री. ना. कि. शिंदे
मो.:९९२१९९२७१६

• परीक्षा मंत्री :
श्री. शि. ग. खामकर
हिंदी परीक्षा समिति, सातारा
मो.:९७६३२४१८६३

• सचिव :
श्री. श्री. कृ. लावंड
राष्ट्रभाषा भवन समिति,
सातारा, मो.:९८८१६६८७६८

• सलाहकार :
श्री. गो.म.दाभोलकर
मो. ९४२३५२९२८०

जा. क्र. : ५२९/२०२२-२३ दिनांक : १९/११/२०२२

## स्वातंत्र्य सेनानी, क्रांतिकारी संक्षिप्त जीवनियाँ : वीडियो एक निहायत प्रशंसनीय उपक्रम

सौ.उज्ज्वला जनार्दन मोरे, विठामाता कन्या विद्यालय, कराड की एक होनहार उपक्रमशील, हिंदी अध्यापिका हैं। वह सातारा जिला हिंदी अध्यापक मंडल के कार्यकारी मंडल की सक्रिय सदस्य हैं। विगत लगभग दो तपों से शिक्षा क्षेत्र में विभिन्न विषयों के माध्यम से आप गौरवशाली योगदान दे रही हैं।

मुझे यह बताते हुए गर्व हो रहा है कि आप हमारे राजमाता सुमित्राराजे भोसले विद्यालय, शेंद्रे तहसील सातारा की छात्रा हैं और उन दिनों की वह कुछ विशेष प्रिय विद्यार्थियों में से एक हैं। आप बहुमुखी व्यक्तित्व की धनी हैं। हमें उज्ज्वला जी पर नाज है। अपने प्रभावशाली कार्य से अपनी तहसील में ही नहीं अपितु सातारा जिला हिंदी अध्यापक मंडल, हिंदी शिक्षक महामंडल पर आपने गहरी छाप डाली है।

उज्ज्वला जी की योग्यता को जानते हुए मैंने आजादी के अमृतमहोत्सवी वर्ष के प्रीत्यर्थ देश के जाने-माने स्वातंत्र्य सेनानियों, क्रांतिकारियों की व्यक्तित्व एवं कृतित्व से संबंधित जानकारी हासिल कर उनपर आधारीत वीडियो-ऑडियो तैयार करने की जिम्मेदारी उनको सौंपी। काम बहुत कठिन और जिम्मेदाराना था। हाँ, ना करते हुए आखिर मुझसे सटीक मार्गदर्शन का वादा लेकर इस काम के लिए उज्ज्वला जी राजी हो गई।

अमृतमहोत्सवी वर्ष के आरंभ में ही सप्ताह में दो बार क्रांतिकारियों, स्वतंत्रता सेनानियों के जीवन पर आधारित गागर में सागर भरते हुए क्रांतिकारियों की संक्षिप्त जीवनी का ऑडियो-वीडियो प्रस्तुत करने का सिलसिला आरंभ हो गया। वीडियो के माध्यम से बहुत बढ़िया जानकारी अपनी प्रखर, ओजस्वी वाणी में प्रस्तुत करने लगी । जिले के सभी तहसील गुटों पर, राज्य के अनेक वॉटस एप गुटों पर वीडियों भेजा जाता रहा। देखते-देखते उज्ज्वला जी के नाम का डंका जिले में और फिर राज्य में बजने लगा। सबने इस उपक्रम की खुलकर प्रशंसा की। बहुत अच्छी लिखित और मौखिक प्रतिक्रियाएँ आई। उज्ज्वला जी के साथ मैं भी कृतकृत्य हो गया।

आरंभ में तय हो गया था कि १५ अगस्त २०२२ तक आजादी के अमृत महोत्सव के उपलक्ष्य में ७५ सेनानियों-क्रांतिकारियों की जीवनियों से वीडियों के माध्यम से अवगत किया जाए पर उपक्रम की लोकप्रियता को देखते हुए यह उपक्रम आगे लंबे

महाराष्ट्र राज्य हिंदी शिक्षक महामंडल से संलग्न

# सातारा जिला हिंदी अध्यापक मंडल

(पंजीकरण क्रमांक : महाराष्ट्र/४३७०/सातारा २०-१०-९५)

'राष्ट्रभाषा भवन', बारवकर नगर, संभाजी नगर, सातारा-४१५००४, दूरभाष : (०२१६२)२४८९६६


● अध्यक्ष :
श्री.ता. का. सूर्यवंशी
सातारा, मो.:९४२३०३२९४५

● उपाध्यक्ष :
श्री. बि.कृ.इनामदार
सातारा, मो.:९८२२८२२०३८
श्री. इ.यु.मुल्ला
कराड, मो.:९४२३८२७५९७
श्री. मुजावर श.ई.
पाटण, मो.:९८८११९०५७६

● कार्यवाह :
श्री. अ.सं.यादव
वजरोशी मो.:९५६११९२६७३१

● कोषाध्यक्ष :
श्री. मा. ह. घोरपडे
सातारा, मो.:९८२३३४९८२३

● सहकार्यवाह :
सौ. सु. मा. शिवदास
करंजे, सातारा.
मो.:९९२११०३५९४
श्री. ना. कि. शिंदे
मो.:९९२१९९२७१६

● परीक्षा मंत्री :
श्री. शि. रा. खामकर
हिंदी परीक्षा समिति, सातारा
मो.:९७६३२४१८६३

● सचिव :
श्री. श्री. कृ. लावंड
राष्ट्रभाषा भवन समिति,
सातारा, मो.:९८८१६६८७६८

● सलाहकार :
श्री. गो.म.दाभोलकर
मो.:९४२३५२९२८०


जा. क्र. :

दिनांक : १८/११/2022

अरसे तक यथासंभव चलाना तय हुआ। इस उपक्रम का शिक्षा क्षेत्र में अध्यापकों एवं छात्रों को बड़ा लाभ हुआ। विभिन्न राष्ट्रीय, जीवन मूल्यों के संस्कार करने में लाभकारी प्रतीत हुआ और आगे भी होता रहेगा। यह शानदार जानदार उपक्रम बराबर चलाया जा रहा है। वास्तव में पदवी में हिंदी विषय उनका नहीं था फिर भी दसवीं तक हिंदी का अध्यापन करना, शिक्षकों के प्रशिक्षण में हिंदी में मार्गदर्शन करना, हिंदी के इतने अच्छे-अच्छे उपक्रम चलाना, बड़े-बड़े कार्यक्रमों का सूत्रसंचालन करना। ये भूमिकाएँ एक सशक्त उपक्रमशील अध्यापिका की हैसियत से उज्ज्वला जी बड़े परिश्रमपूर्वक निभा रही हैं।

उज्ज्वला जी ने यह नवोपक्रम हाथ में लिया। अब उसे सच्चे हृदय से बहुत कष्ट उठाते हुए नियमित रूप चला रही हैं। इस उपक्रम से हमारे हिंदी अध्यापक मंडल की भी शान बढ़ गई है। इन वीडियों के माध्यम से अध्यापक, अभिभावक अभी बच्चों पर देशभक्ति,त्याग,बलिदान,श्रमनिष्ठा, कर्तव्य परायणता, एकता, परदुखकसरता, आत्मियता, समर्पन जैसे मूल्यों के संस्कार कर सकते हैं। कल के देश के नागरिकों को प्रेरित,प्रोत्साहित करने के लिए यह उपक्रम काम आ रहा है। देश के लिए त्याग, बलिदान करने वाले महान विभूतियों से बच्चे परिचित हो रहे हैं। चरित्र, व्यक्तित्व निर्माण के लिए बहुत उपयोगी सिद्ध हुआ है यह उपक्रम।

उज्ज्वला जी आप हमारी बहुत ही जटील कसोटी पर खरी उत्तरी, इतना ही नहीं आपने इस उपक्रम को लोकप्रिय बनाया है, इससे हम फुले नहीं समाए। आपको शुभाशीष और हार्दिक शुभकामनाएँ!

ता.का.सूर्यवंशी
अध्यक्ष
सातारा जिला हिंदी अध्यापक
मंडल, सातारा

स्थापना - जून १९६२

॥ जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ॥

फोन नं. (०२१६४) २२०४३४

श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट, कन्हाडचे

# विठामाता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, कऱ्हाड

ISO 9001 : 2015 मानांकन प्राप्त विद्यालय

एस. एस. सी. नोंदणी नं. २१.०२.०२६ | एच. एस. सी. नोंदणी नं. २१.०२.०१० | यु डायस नं. २७३१०७०१२०५

कायम मान्यता - मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे पत्र क्र. एस-१-कायम मान्यता - कोवि - २५४०१ दिनांक ८-१०-८२

जावक नं. - /२०

दिनांक - ३०/११/२०२२

## ॥ मुख्याध्यापिका अभिप्राय ॥

"मदत तंत्रज्ञानाची गाथा स्वातंत्र्य वीरांची"

हा नवोपक्रम विठामाता विद्यालयातील सौ. उज्वला जनार्दन मोरे मॅडम यांनी राबविला. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना संपूर्ण भारतभर विविध उपक्रम राबविण्यात आले व उपक्रमांच्या माध्यमातून स्वातंत्र्यासाठी आहुती देणाऱ्या देशभक्तांचे प्राणार्पण पुनश्च एकदा प्रत्येक भारतीयांच्या नजरेसमोर आले. शैक्षणिक, सामाजिक, पर्यावरणीय, शास्त्रीय पातळीवर अनेक प्रकारचे अनपेक्षित बदल होत असताना निर्माण होणाऱ्या नव्या पिढीला या सर्व बाबींची जाण करून देणे अत्यंत महत्वाचे आहे. जबाबदार नागरिकत्व निर्माण होण्याच्या दृष्टिने अशी पाऊले उचलणे हे परिपक्वतेचे लक्षण आहे. या दृष्टिने विद्यालयातील विद्यार्थिनींनी प्रत्येक क्रांतीकारकांची माहिती स्वतः गोळा केली व प्रस्तुतीकरणाचे व्हिडीओ तयार केले यातून स्वातंत्र्यासाठी दिलेल्या योगदानाची माहिती व महती विद्यार्थिनींच्या लक्षात आली स्वातंत्र्याच्या चळवळीत स्वतःला समर्पित केलेले स्वातंत्र्यवीर ते पुरुष असो वा स्त्री स्वतःचे संपूर्ण जीवन देशासाठी समर्पित केले व हीच देशभक्तीची भावना या नवोपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थिनींमध्ये रुजवण्यास निश्चितच मदत होईल.

विठामाता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय ★ कराड

Pawar

मुख्याध्यापिका
विठामाता विद्यालय, कराड

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीम/डॉ. सौ. उज्वला जनार्दन मोरे ......... प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला ........................................
मदत तंत्रज्ञानाची, गाथा स्वातंत्र्यवीरांची ..................
हा नवोपक्रम माझ्या स्वत:च्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वत:ला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : १८।११।२०२२

स्थळ : कराड

स्पर्धकाची स्वाक्षरी

नाव सौ. उज्वला जनार्दन मोरे

शाळेचा /कार्यालयाचा शिक्का.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीम/डॉ. सौ. उज्वला जनार्दन मोरे .......... हे माझ्या शाळेत / कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला ..............................
मदत तंत्रज्ञानाची, गाथा स्वातंत्र्यवीरांची ........................
हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये त्यांनी स्वत: राबविलेला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : १८।११।२०२२

स्थळ : कराड

शाळा/ कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

नाव : सौ. विजया सुरेश पवार

शिक्का:

**मुख्याध्यापिका**

**विठामाता विद्यालय, कराड**